# मराठवाड्यातील दुष्काळाचे ग्रामीण कादंबरीतील चित्रण

**ज्ञानेश्वरी विठ्ठलराव मुंडे**
संशोधक विद्यार्थी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

**प्रस्तावना :-**

भारत हा एक कृषिप्रधान देश आहे. येथील जनतेचा मुख्य व्यवसाय शेती आहे. शेतीच्या विकासासाठी पाण्याची आवश्यकता असते. पाणी हे निसर्गावर अवलंबून आहे. निसर्गाच्या लहरीवृत्तीमुळे कधी अतिवृष्टी तर कधी अवर्षण यामुळे कृषिव्यवसाय धोक्यात येतो व यातुन दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण होते. महाराष्ट्राला किंवा मराठवाड्याला दुष्काळ नवा नाही. असे म्हंटले जाते 'मराठवाड्याच्या तर दुष्काळ पाचवीला पूजलेला आहे'. मराठवाड्यातील काही तालूके तर काही जिल्हे हे दुष्काळात होरपळतांना दिसून येतात. मराठवाड्यातील व महाराष्ट्रातील जनतेने छोटे-मोठे अनेक दुष्काळ व त्यांच्या झळा सोसल्या आहेत. कधी अवर्षनामुळे जनता कोरड्या दुष्काळाला तर कधी अतिवृष्टी व अवकाळीमुळे ओल्या दुष्काळाला तोंड देतांना दिसून येते. दुष्काळ म्हटला की पाणीटंचाई, पाऊसाचा अभाव, रखरखते माळरान, पडीक जमीन डोळ्यापुढे येते ते कोरड्या दुष्काळाच्या भयावह परिणामामुळेच साठोत्तर काळात ग्रामीण कादंबरीतून हे सभोवतालचे समाजवास्तव चित्रित होऊ लागले. नवशिक्षित ग्रामीण तरुण आपल्या परिसरातील ओला-सुका परिसर, दुष्काळासारखी आपत्ती व त्याचा होणारा परिणाम आपल्या साहित्यकृतीतून प्रकट करु लागले. यातूनच दुष्काळचित्रित मराठी ग्रामीण कादंबऱ्याची निर्मिती होत गेली. मराठवाड्यातील दुष्काळाचे प्रतिबिंब मराठी ग्रामीण कादंबरीतून पडलेले दिसून येते. त्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोध निंबधात करण्यात आलेला आहे.

**दुष्काळाच्या व्याख्या :-**

**विस्तारीत शब्दरत्नाकर:**

"दुष्काळ म्हणजे आपत्तीचा काळ, अतिवृष्टी, अनावृष्टी, टोळधाड धान्यादिकांची महर्गता" [१]

**प्राध्यापक लेविस :**

"कृषि उत्पादनातील घट, पाण्याचा तुटवडा, प्राण्यांच्या चाऱ्याचा व वैरणीचा तुटवडा, अन्नधान्यटंचाई या सर्वांचा समतोल साधत असताना पावसाचा लहरीपणा आणि कमी होणारे कृषिउत्पन्न, बाष्प, आर्द्रता व पाण्याचा अभाव यासर्व बाबी ज्यामुळे प्रभावित होतात त्यास दुष्काळ असे म्हणतात." [२]

**कुलकर्णी रमाकांत (बापू)-**

"ज्या परिस्थितीत आपण काहीही बदल घडवून आणू शकत नाही. अशी हतबलता निर्माण होणे म्हणजे दुष्काळ."[३]

एकूणच दुष्काळ म्हणजे अवर्षन, अतिवृष्टी, अवकाळी, वाईट परिस्थिती, टंचाईचा काळ, अन्नधान्य तुटवडा, उपासमार, मुत्यूचे वाढते प्रमाण, रोगराईचा प्रसार, महागाई, वाढत्या आत्महत्या, कृषि व्यवसायाची पडझड, अल्प पर्जन्यमान, हतबलता, नापिकी होय.

**मराठवाड्यातील दुष्काळ व ग्रामीण कादंबरी :**

महाराष्ट्रातील विविध प्रदेशातील दुष्काळीजीवन ग्रामीण कादंबरीतून प्रत्ययाला येते. दुष्काळातील विविध प्रश्न ग्रामीण कादंबरीने आशय-विषय बनवलेले आहेत. 'बळीबा पाटील', 'पिराजी पाटील', 'पाणकळा', 'कसे दिवस जातील', 'बनगरवाडी', 'असं जगणं तोलाचं', 'मध्यरात्र', 'धुळपेरणी', 'धुळपावलं', 'चारापाणी', 'बारोमास', 'तहान', 'रानखळगी', 'शापित', 'पांगिरा', 'वनवास', 'पांढर', 'छावणी', 'जलपर्व', 'फकिरा', 'कोयता', 'बळ', 'जोहड', 'सर्ज्या', 'आरंबळ' इ. ग्रामीण कादंबऱ्यातून दुष्काळाचे विविधांगी चित्रण केलेले आहे.

मराठवाड्यातील जनता दुष्काळात सतत होरपळताना आढळते. दुष्काळ हा एकटा कधीच येत नाही. समस्यारुपी पिलांना तो जन्म देतो. अनेक कुटुंबे १९७२-७४ च्या दुष्काळात परागंदा झाली होती. अशाच परागंदा झालेल्या कुटुंबाची शोकात्म कथा 'अरुण साधू' यांच्या 'शापित' मध्ये चित्रित होते. ज्ञानोबा व सोनबाचे कुटुंब प्रातिनिधिक रुपात 'शापित' मधून चित्रित होते. शेतकरी कुटुंबाच्या वाताहातीची कहाणी 'शापित' मधून चित्रित होते. 'शापित' कादंबरीला बीड

जिल्ह्यातील रिंगणवाडी खेड्याची व भटकंतीच्या प्रवासात येणारी शिरसगाव, श्रीगोंदा व मुंबईतील वातावरणाची पार्श्वभुमी लाभलेली आहे. रिंगणवाडी ते मुंबई असा भटकंतीचा प्रवास 'शापित' मधून चित्रित होतो. सततच्या दोन-तीन वर्षाच्या दुष्काळाने गावातील एक एक तांडा बाहेर पडत होता. ज्ञानोबा व सोनबाचे कुटुंब ही जगण्यासाठी कामाच्या शोधात भटकंतीचा प्रवास करते. सारजा, वामण, बायजा, शंकऱ्या, तान्ह हे ज्ञानोबांचे कुटुंब तर सोनबा व रुख्मी हे सर्व पायी चालत भटकंती करतात. चार चार दिवस ज्ञानोबाच्या चूलीला भाकरी लागत नव्हती. चिंचोके, कंदमुळे यावर भुक भागवली जात होती. भुकेसाठी तान्हेचे केकाटने सतत चालू होते. शिरसगावच्या कालव्याच्या कामावर या कुटुंबाला सुपरवायझरच्या वासनावृत्तीचा त्रास सहन करावा लागतो. येथेच तापाने तान्ह्याचा मृत्यू होतो. पुढील प्रवासात वामण-रुख्मी पोटाची आग शांत करण्यासाठी बागेतील फळांची चोरी करतात. या कुटुंबावर दुसरे संकटे कोसळते ते ज्ञानोबा व सोनबाचे वाट चूकणे. वामण सैरभैर होतो, शोधाशोध करुणही आपल्या वडीलांचा पत्ता लागत नाही. दुष्काळामुळे अशक्त व तापाने फणफणणारी सारजा मंदीरातून रात्रीतून गायब होते. वामणची अवस्था पंख छाटलेल्या पक्षाप्रमाणे होते. रुख्मी बायजाची जबाबदारी वामणवर पडते. आपली माणसं भेटतील या आशेने वामण मुंबईला जातो. तेथेही त्यांना गुंड, मवाली यांचा त्रास सहन करावा लागतो. भांडी साफसफाई करुन उघड्यावर झोपणाऱ्या वामण-रुख्मी यांच्या जीवनात आणखी एक संकट कोसळते. समुद्रावर गेल्यानंतर वामन-रुख्मीवर हल्ला होतो व रुख्मणीचे गुंड अपहरण करतात. असा मन सुन्न करणारा शोकात्म शेवट कथानकाचा होतो. भूक हे केंद्र कथानकाच्या शेवटपर्यंत प्रत्ययाला येते.

भीमराव वाघचौरे यांच्या 'रानखळगी' कादंबरीतून वैजापूरच्या आसपासचा परिसर पार्श्वभूमी आहे. १९७२-७४ च्या दुष्काळात कोलमडून पडलेल्या शेतकऱ्याची वाताहत 'रानखळगी' मधून भीमराव वाघचौरे चित्रित करतात. भीमराव वाघचौरे कादंबरी विषयी आपले मत नोंदवतात ते असे " 'रानखळगी' हे आत्मचरित्र नाही. ते आत्मकथनही नाही. १९७२-७४ च्या दुष्काळात होरपळलेल्या, कोलमडून पडलेल्या कुणाही एका शेतमजुराच्या फाटक्या संसारातील अनुभवांचे ते बोल आहेत."[४] दामा हा कादंबरीचा निवेदक आहे. ओल्या-कोरड्या दुष्काळामुळे अनेक शेतकऱ्यांचे संसार फाटत-तुटत जातात. अशा कुटुंबाला मुलांचे शिक्षण करताना अनेक संकटाचा सामना करावा लागतो. कुटुंबाची ससेहालपट होते. दामाचे कुटुंब प्रातिनिधिकतेने चित्रित होते. आनंदाच्या वार्ताने कथानकाचा प्रारंभ होतो आणि पुन्हा कथानक गतकाळात रममान होते. दामा हा शेतकरी कुटुंबातला असतो. दायगाव हे गाव असते. एकीकडे दामाचे शिक्षण व दुसरीकडे दामांच्या कुटुंबाची ओल्या-कोरड्या दुष्काळाने होणारी ससेहोलपट भीमराव वाघचौरे चित्रित करतात. आपल्याप्रमाणे कष्टमय जीवन मुलाच्या वाट्याला येऊ नये यामुळे दामाचे आई-वडील कष्ट करतात. दावणीची गुरे विकतात. कुटुंबाची होणारी उपासमार, तान्हेचे रडणे, दुष्काळामुळे पिकांचे होणारे नुकसान, बेभाव विकणारा माल, मुगा-उडदांना फुटणारे कोंब, दामाच्या कुटुंबाला गाव जोडण्याची आलेली वेळ, ओसाड पडलेले गाव, दामाने केलेली कष्टाची कामे, खोडक्या फोडून, ट्रॅक्टर चालवून, सालगडी राहून दामाने आजी व बहिणीची घेतलेली काळजी, दामाला शिक्षण घेतांना येणारी संकटे, कोसोमैल पायी भटकंती, फी साठी कॉलेजमध्ये करावी लागणारी वेगवेगळी कामे, अशोक हॉटेल मध्ये वेटर म्हणून करावे लागणारी कामे, नोकरीच्या आशेने खुलताबादच्या इलेक्ट्रिसिटी बोर्डात मेहनतीची करावी लागणारी कामे, जनार्दन स्वामीच्या आश्रमात विटक्या भाकरी खाऊन राहणारा दामा, वाचनालय, रात्रीचे वर्ग घेऊन पुढील अभ्यासक्रम पूर्ण करणारा दामा, दामाच्या कुटुंबाला रोजगार हमीची करावी लागणारी कामे, पालापाचोळ्यावर जगणारी जनावरे इ. या सर्वांचा प्रत्यय 'रानखळगी' कादंबरीतून येतो. दामाचे कष्टमय जीवन, संयम, धाडसी वृत्ती, शिक्षणाची जिद्द, आई वडीलांचा फाटत चाललेला संसार वास्तवतेने चित्रित होतो. दामावरील संकटांनी वाचकही व्याकूळ होतो. वाचकाचे मन सुन्न करणारे अनेक घटना-प्रसंग चित्रित होतात.

रा.रं.बोराडे यांची 'चारापाणी' कादंबरी दुष्काळात निर्माण होणारी 'चारापाणी' समस्या चित्रित करते. १९८४-८५ च्या दुष्काळाची पार्श्वभुमी 'चारापाणी' कादंबरीला लाभली आहे. शेती व्यवसायाचा आधार असलेले शेतकऱ्याचे पशुधन जगवणे या प्रेरणेने 'चारापाणी' कादंबरी चित्रित होते. अंबेजोगाई येथील मानवलोक संस्थेने दुष्काळात चाराटंचाईच्या काळात चारा छावणीची अभिनव योजना सुरु केली होती. यामध्ये शेतकऱ्यांनी दिवसभर बैल शेतात राबवून रात्री केवळ दहा पैसेभरुन आपली बैलं छावणीत सोडायची. याच कल्पनेने 'होरपळ' कथा लिहिली. याच कथेचे विस्तारीत रुप म्हणजे 'चारापाणी' कादंबरी. या काळात पाणीटंचाई तीव्र होत चालली होती. बोराडे वृत्तपत्रात मन पिळवटून टाकणारी एक बातमी वाचतात. ती अशी एका तांड्यावरील स्त्रीला नुकत्याच झालेल्या अर्भकाचं नैसर्गिक आवरण धुण्यासाठी पाणी न मिळाल्याने ते अर्भक मेलं होतं. ती स्त्री "पाण्याविना माझं बाळ मेलं रं भाऊ!"[५] म्हणून टाहो फोडत होती. या घटनेने बोराडेंच संवेदनशील मन 'चारापाणी' सारख्या कादंबरी लेखनाकडे वळले.

सुखदेव हा कादंबरीचा नायक असतो. एका-एका घटना-प्रसंगातून कादंबरीचे कथानक गती घेते. सुखदेव आपल्या गावात येतो. तेंव्हा चारापाण्याची तीव्र टंचाई जाणवते. दत्तू घायवाट सारखा एखादा गाव सोडतो तर शेलार सारखा बैलाच्या गळ्यात दाखले बांधून बैलांना संभाळी घेण्यास सांगतो. पाण्याविना गावकरी हैराण असतात. सुखदेवच्या आंगोळीच्या प्रसंगातून याची तीव्रता लक्षात येते. ‘‘राही बाईनं बाज आणली. सुखदेवानं कपडे काढले. तो बाजेवरच्या खोलगट भागात बसला. राहीबाईनं त्याला घंगाळभर पाणी दिलं. बाजेवरच्या ज्या भागात तो बसला होता त्याच्या नेमकं खाली तिने टोपलं ठेवलं. तो आंघोळ करीत असताना अंगावरुन ओघळलेल्या पाण्याच्या प्रत्येक थेंब नेमका टोपल्यात पडावा म्हणून ती टोपलं इकडं-तिकडं करीत राहिली.’’ [६] या घटनाप्रसंगातून बोराडे पाण्याच्या थेंबाचे महत्व व पाणी टंचाईची तीव्रता चित्रित करतात. रामा सुराशेच्या बायकोचा विहिरीत पडण्याचा प्रसंग पाणीटंचाईची तीव्रता दाखवून देतो. पाण्याप्रमाणे चाऱ्याचा प्रश्न तीव्र झाला होता. सर्व शेतकरी टंचाईमुळे आपले बैल आबाराव शेळकेच्या संभाळी घालत होते. आबाराव शेळके मात्र चाऱ्याच्या बदल्यात बैलाकडून शेतीची कामे फुकटात करुन घेत होता. आबाराव शेळके सोडून गावात कोणाकडे ही शिल्लकचा कडबा नसतो. सुखदेवचा मात्र याला विरोध असतो. गावकऱ्यांना सुखदेव अडवतो. गावात संघर्षाचे वातावरण निर्माण होते. बैलाप्रमाणे लोक शेतीही खंडाने शेळकेला देत होते. व स्वतःच मजूर म्हणून राबत होते. शेळके या परिस्थितीचा पुरेपुर फायदा घेत होता. शेतकऱ्यांचा चारापाणी प्रश्न सोडवण्यासाठी सुखदेव गटविकास अधिकारी, कारखान्याचे चेअरमन, तहसिलदार, शेतकरी संघटनेचा अध्यक्ष इ. ची भेट घेतो व या प्रश्नांवर चर्चा करतो. यामध्ये त्याला अपयश येते. गैरव्यवहार, फसवणूक, लबाडणूक इ. वृत्ती-प्रवृत्तीचा प्रत्यय सुखदेवला येतो. शेवटी सुखदेवचे विचार गावकऱ्यांना पटतात व मागण्याच्या पाट्या बैलाच्या कपाळी लावून जनावरांचा मुकमोर्चा तालुक्याच्या दिशेने जातो. स्वतः व इतरांना रस्त्यावर उतरवण्यास भाग पाडणारा नायक बोराडे चित्रित करतात. ‘चारापाणी’ मधून बोराडे ‘चारापाणी’ समस्येवरील विविध उपाय सुचवू पाहतात.

आनंद कदम यांच्या ‘वनवास’ कादंबरीतून ओल्या-कोरड्या दुष्काळामुळे शेतकऱ्यांचे होणारे हाल व दुष्काळात होणारी फसवणूक, लुबाडणूक याचे दाहक वास्तव चित्रित होते. दुष्काळामुळे हैराण झालेला शेतकरी, कर्जामुळे आत्महत्या करणारा शेतकरी, जनतेसाठी लढणाऱ्या व बलिदान देणाऱ्या निवृत्त स्वातंत्र्यसैनिकाचे दर्शन घडते. शेतीजीवनाशी व दुष्काळाशी संबंधित विविध घटकांचा वेध ‘वनवास’ कादंबरी उपरोधिक शैलीत घेते. शासन, प्रशासन, व्यापार, दलाल यांच्यावर शाब्दिक हल्ले, टीका याचा प्रत्यय कादंबरीतून येतो. नांदेड जिल्ह्यातील हादगाव, रुई, निवघा परिसरातील जीवनवास्तवाची पार्श्वभुमी कादंबरीतून चित्रित होते. निवेदक शहरात राहणारा शिक्षित नौकरदार आहे. आजोळच्या आठवणी, आजोबाचे कतृत्व, निसर्गाचा प्रकोप, शेतीव्यवसायाची अवकळा, शासनाची निष्क्रियता, व्यापाऱ्यांची फसवणूक, शेतकऱ्यांचा मोर्चा, प्रेतयात्रा इ. चा प्रत्यय कादंबरीतून येतो.

पाऊसाअभावी पिके सुकू लागतात. जमिनीला भेगा पडतात. मातीतले बी मातीत कुजुन जाते. वर आलेले कोंब पाखरे खातात व तडफडून मरतात. चाऱ्याअभावी जनावरांचेही हाल होतात. रोगराईने पटापट जनावरे मरु लागतात. रस्त्याने दिसणारी हाडे, मांस खाऊन भुक भागवणारे मांग-महार, खाटकाला जनावरे विकणारे शेतकरी याचा प्रत्यय ‘वनवास’ मधून येतो. पाऊसासाठी गावकरी पुजा-विधी करु लागतात. शेठ-सावकार मात्र धनाढ्य बनले होते. छोट्या-मोठ्या चोऱ्या होऊ लागतात. दुष्काळामुळे कोणताच सण साजरा होत नव्हता. दुष्काळी कामावर घरंदाज कुटुंबानी हजेरी लावली होती. कामावरील अधिकारी गैरव्यवहार करत होते. पोटासाठी गावकरी दुरदुरच्या गावी जात होते. गाव ओस पडले होते दुषीत पाण्याने माणसे ही मरु लागले. कोरड्या दुष्काळाचे भयावहता कादंबरीतून प्रत्ययाला येते.

ओल्या दुष्काळाने माजवलेला हाहाकार भयावहतेने चित्रित होतो. सततचा मुसळधार पाऊस, वादळ, वारे, विजांचा कडकडाट, गारपीट यामुळे ग्रामजीवन व प्राणीजीवन यावर भयावह परिणाम झाला होता. शेतीमाल मातीत मिसळतो. पिकांना कोंब येतात. शेतकरी हवालदिल झाला होता. विजाने कोणाचे बैल, माणसे, जनावरे मरतात, जखमी होतात. फळबागायतदारांचे, वीटभट्ट्यांचे नुकसान झाले होते. नवविवाहीत विधवा झाल्या होत्या. दुष्काळात भर म्हणून व्यापारी लुटत होता. मालाला बेभाव, सरकारकडून ही ऊसाची बिले वेळेवर मिळत नव्हती. पिकावर स्वप्न पाहणारा शेतकरी आत्महत्या करत होता. हुंडा प्रथा व यामुळे जीव देणारे धनाजीराव सारखे शेतकरी प्रातिनिधिक रुपात चित्रित होतात. हिरामण बापू सारखा सशक्त शेतकरी नेता शासनाला धारेवर धरतो. दुष्काळग्रस्तासाठी रस्त्यावर उतरतो. अल्प मदत देणाऱ्या धनादेशाची होळी केली जाते. न्यायासाठी प्रेतयात्रा काढली जाते. ‘वनवास’ कादंबरी दुष्काळातील विविध समस्यांचा सखोल वेध घेते.

भीमराव वाघचौरे यांच्या ‘अंगारकुस’ कादंबरीतूनही कोरड्या दुष्काळाचे वातावरण चित्रित होते. आटणाऱ्या नद्या, सुकणारे बी, महागाई, उपासमार, मजुरीचे प्रश्न, पोटासाठी भटकंती, ओस पडणारे खेडे ‘अंगारकुस’ मधून चित्रित

होते. अक्का दुष्काळात काम करून माणिकच्या शिक्षणाचा खर्च भागवते. ओस खेडे व कोलमडून पडलेले शेतकरी जीवन कादंबरीतून प्रत्ययाला येते.

रेखा बैजल यांची 'जलपर्व' कादंबरी पाणी टंचाईची समस्या चित्रित करते. ही कादंबरी दीर्घ पाणी प्रकल्पाची कल्पना चित्रित करते. जालना परिसरातील लोक पाणी प्रश्नांने त्रस्त असतात. विहिरी , हापशी यांचे पाणी आटत चालले होते. पाण्यासाठी प्रचंड गर्दी, दूषित पाणी, आठ-आठ दिवस नळाला न येणारे पाणी, शेतातील सुकणाऱ्या फळबागा, पाण्यासाठी कोसोमैल भटकंती, मुलगा-मुलगी भेद करुन छोट्या चिमुकलीला खोल अंधाऱ्या विहिरीत सोडणारी ग्रामीण स्त्री, समीर सारखा आदर्शवादी विकास अधिकारी, त्याने पाणी प्रश्नांसाठी केलेले दौरे, पाहणी, नियोजन त्याला या कामात आलेले दबाव, स्थानिक पुढाऱ्यांचा विरोध, तीव्र पाणी टंचाईच्या काळात साखर कारखाने उभा करणारे स्थानिक पुढारी, समीरची दीर्घकालीन नदीजोड प्रकल्पाची योजना, यामधील जनतेचे सहकार्य इ. चा प्रत्यय 'जलपर्व' कादंबरीतून येतो.

शेषराव मोहिते यांच्या 'असं जगणं तोलाचं' या कादंबरीतून लातूर परिसरातील दुष्काळी जीवन चित्रित होते. अल्पभुधारक कोरडवाहू शेतकरी. त्याचे दारिद्र्य, कर्जबाजारीपणा, नापिकी, उपासमार शेतीशी संबंधित बंद पडलेले जोडधंदे याचे चित्रण 'आसं जगणं तोलाचं' कादंबरीतून येते. हरिबाचे कुटुंब प्रातिनिधीक रुपात चित्रित होते. लग्नकार्य यामुळे कर्जबाजारी होणारा हरीबा, वसुलीसाठीचा सावकाराचा तगादा, हाणमुची आत्महत्या, दुष्काळात मेहनत करुन खोदली जाणारी विहिर, रोजगार हमीची कामे, श्रीमंत कुटुंबांनी रोजगार हमीच्या कामावर लावलेली हजेरी, सुकडीवर भुक भागवणारे लोक इ. चे वास्तव कादंबरीतून उमटते.

एकुणच दुष्काळाची विविधता व वेधकता वरील कादंबऱ्यातून प्रातिनिधीक रुपात चित्रित होते. दुष्काळातील विविध समस्यांना ग्रामीण कादंबरी मुखर करतांना दिसते. उपासमार, चारापाणी टंचाई, स्थलांतर, अवकाळी, अतिवृष्टी, अवर्षण, मजुरीचा प्रश्न, कर्जबाजारीपणा, शेतकरी आत्महत्या, शेतकऱ्यांची आंदोलने, शेतकऱ्यांचे शोषण फसवणूक, लबाडणुक, ओस पडणारे खेडे, दुष्काळग्रस्तांची उध्दवस्त भावनिकता, स्त्रियांचे शोषण इ. वेध वरील ग्रामीण कादंबरीतून घेतलेला दिसून येतो.

**निष्कर्ष :-**

१) मराठवाड्यातील बीड, लातूर, नांदेड, औरंगाबाद, जालना इ. परिसरातील दुष्काळी जीवन ग्रामीण कादंबरीतून चित्रित होते.

२) कोरड्या व ओल्या दुष्काळाची भयावहता व भीषणता कांदबरीतून प्रत्ययाला येते.

३) दुष्काळाचे चित्रण विविधतेने व वेधकतेने चित्रित होते.

४) दुष्काळामुळे ओस पडलेले खेडे व कृषि व्यवसायाची पडझड वास्तव व विविध पातळीवर चित्रित होते.

५) शासन व प्रशसनाची निष्क्रियता, शोषण, फसवणूक, लुबाडणूक याचा प्रत्यय कादंबरीतून येतो.

६) मुक्या जीवाच्या जीवनव्यथा चित्रित होतात.

७) दुष्काळावरील उपाययोजनात्मक विचार कादंबरीतून चित्रित होतात.

**संदर्भ :-**

१) 'विस्तारीत शब्दरत्नाकर', 'आधसंपादक व लेखक- आपटे वा.गो. (विस्तारक ह.अ.भावे), वरदा बुक्स, पुणे प.आ. १६६५. पृ. ३३१.

२) प्रा. डॉ. पाटील संजय जिजाऊ- (घेतलेली नोंद) 'ब्रिटीश कालीन खानदेश आणि दुष्काळ', सम्यकता प्रकाशन, धुळे. पृ. ५२.

३) कुलकर्णी (बापू) रमाकांत- 'इथे नांदतो दुष्काळ', समकालीन प्रकाशन, पहिली आवृत्ती १ मे २०१३, पृ.८

४) वाघचौर भीमराव - 'रानखळगी', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, दु.आ. १९९७, पृ.४.

५) बोराडे रा.रं- 'चारापाणी', मेहता पब्लिशिंग हाऊस, सदाशिव पेठ, पुणे, व्दितीय आवृत्ती, १९९८, कादंबरीविषयी मनोगत पृ. ५.

६) तत्रैव, पृ. ५.